# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११००१
दुरध्वनी क्र.२६१३३८३३, २६१३९३००

*** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,पुणे ***

**जाहिरात**

*** लेखनिक पदाच्या भरतीसाठी ऑनलाईन परिक्षेबाबत सविस्तर माहिती ***

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे या बँकेकरीता लेखनिक हुद्दयाची रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून निवड सूची तयार करणेसाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. बँकेचे संकेत स्थळः **https://pdccbank.co.in/careers/** व **https://punedccbank.in**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेत स्थळावर अर्ज भरणे | दि.०७.०८.२०२१ ते दि. १६.०८.२०२१ रोजी पर्यंत |
| २. | ऑनलाईन परिक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.०७.०८.२०२१ ते दि. १७.०८.२०२१ सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| ३. | ऑनलाईन परिक्षा शुल्क भरणा माहिती संकेत स्थळावर अद्ययावत(Update) करण्याची अंतिम दिनांक | दि.०७.०८.२०२१ ते दि. १८.०८.२०२१ रोजी पर्यंत |
| ३. | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५. | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | ऑनलाईन परिक्षा निकालानंतर बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |

*** सूचना ***

१) ऑनलाईन परिक्षा शुल्क संकेत स्थळावर अद्ययावत (Update) केल्या शिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पुर्ण होणार नाही.

२) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये चलनाद्वारे भरणा करता येईल.

३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना त्यांनी स्वतःचा ईमेल–**आयडी**,मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.

४) उमेदवारांनी अर्ज भरताना लेखनिक पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा.

५) **सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B. J. ROAD, PUNE-1.

लेखनिक पदाच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमदेवारांकडून ऑनलाईन अर्ज विहित नमून्यात सादर करण्यासाठीचे पात्रता, निकष व इतर तपशिल खालीलप्रमाणे...

## अ) शैक्षणिक अर्हता :

| पदाचे नाव | पदसंख्या | वयोमर्यादा | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| लेखनिक | ३५६ | किमान २१ वर्ष<br>व<br>कमाल ३८ वर्षे | उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किमान ५०% गुणाने उत्तीर्ण असावा.<br>**आणि**<br>उमेदवार एम.एस.सी.आय.टी. किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र प्राप्त असावा. (संगणक पदवी असल्यास अट शिथिल) |

१) दि.३०.०६.२०२१ रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

२) उपरोक्त रिक्त ३५६ पदांची संख्या कमी करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे. तसेच सदर भरती प्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करण्याचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

## ब) वेतन श्रेणी :

| | |
|---|---|
| लेखनिक | २४५-२०-३०५-२५-४३०-३०-५८०-३५-७५५-४०-९५५-४५-११८०-५०-१४३०-५५-१७०५-५५-१९८० |
| | अंदाजे एकत्रित वेतन रु.२२,०००/- व बँकेच्या नियमानुसार लागू असणारे भत्ते. |

## क) निवड कार्यपध्दती :

### १) ऑनलाईन परिक्षा :

लेखनिक श्रेणीतील पदांकरीता ९० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षेसाठी खालील विषयांच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी असेल.

| अ.क्र | विषयाचे नाव | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १ | बँकींग व सहकार | ३० |
| २ | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | २० |
| ३ | कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था | १० |
| ४ | मराठी भाषा ज्ञान | १० |
| ५ | संगणक व माहिती तंत्रज्ञान | १० |
| ६ | बुद्धीमापन चाचणी | १० |
| | **एकूण गुण** | **९०** |

## २) कागदपत्रे पडताळणी व मुलाखत :

ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमूद पद संख्येच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची आसन क्रमांक निहाय यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रांची प्राथमिक कागदपत्रे पडताळणीसाठी व मुलाखतीस ऑनलाईन पद्धतीने मुलाखतपत्र उपलब्ध करुन दिले जाईल. सदर मुलाखतपत्र ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावे. मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास **support@punedccbank.in** या ई-मेल द्वारे व **9511262588, 7517824568** या हेल्पलाईनद्वारे संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीवेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवारच बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.

## ३) मुलाखत :

कागदपत्रे पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची बँक गठीत समितीकडून मुलाखत घेण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. सदर मुलाखत १० गुणांची असून सदर गुणांचे भारांकन बँक धोरणानुसार असेल. त्यामध्ये १० पैकी ५ गुण संबंधित उमेदवारांच्या खालील शैक्षणिक पात्रतेनुसार देण्यात येतील व उर्वरित ५ गुण मौखिक मुलाखतीसाठी देण्यात येतील.

**मुलाखतीतील शैक्षणिक अर्हतेसाठी ५ गुणांचे गुण भारांकन खालील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १ | कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी | १ |
| २ | विशेष पदवी (बी.कॉम,बीएससी ॲग्री व संलग्न /बीव्हीएससी ॲन्ड एएच, बीई/ बीटेककॉम्प्युटर/आयटी,बीसीएस,बीबीए,एलएलबी ) | १ |
| ३ | एचडीसीएम/डीसीबीएम | १ |
| ४ | जीडीसी ॲन्ड ए | १ |
| ५ | मराठी व इंग्रजी टायपिंग शासकीय प्रमाणपत्र धारक (प्रत्येकी १/२ गुण) /स्टेनोग्राफर (शासकीय प्रमाणपत्र धारक) | १ |
| | **एकूण गुण** | **५** |

## ४) उमेदवारांची अंतिम निवड सूची :

उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण यांची बेरीज करुन एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे गुणांसह अंतिम निवड सूची व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे ३५६ पद संख्या विचारात घेता, अंतिम निवडसूची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांमध्ये पुणे जिल्हयातील उमेदवार, उमेदवार धारण करीत असलेली उच्च/शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयाची सेवाजेष्ठता व आडनावाच्या इंग्रजी अक्षरांनुसार याक्रमाने प्राधान्य देऊन अनुक्रमे उमेदवारांची यादी मर्यादित करण्यात येईल.

त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे/गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या लेखनिक हुद्दयाच्या पदी परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल.

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.

## ५) परिविक्षाधीन कालावधी (प्रोबेशन पिरियड) :

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना १ वर्षासाठी परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीमध्ये रु.१३,५००/- दरमहा संकलित पगार देण्यात येईल. सदर उमेदवारास नेमणूकीबाबतच्या बँकेच्या स्थायी आदेशातील व सेवानियमावलीतील प्रचलित नियम, अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

## ड) ऑनलाईन परिक्षा शुल्क :- शुल्क

ऑनलाईन परिक्षेकरीता रु.८८५/- (सर्व करांसह) शुल्क आकारले जाईल, सदर ऑनलाईन परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परिक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही.

## इ) ऑनलाईन परिक्षे संदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सूचना:-

१) उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) उमेदवारांनी भरती प्रक्रियेकामी कोणत्याही पदाधिकारी/अधिकारी यांचेकडून शिफारस/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही टप्प्यावर अपात्र घोषित करुन निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.

३) ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले जाईल.

४) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा, कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

५) यापुर्वी बँकेकडे याच पदासाठी अर्ज केले असतील तर त्यांचे पुर्वीचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाही. त्यांना नव्याने ऑनलाईन पद्धतीने विहीत नमून्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

६) भरती प्रक्रियेत/निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तिक स्वरुपात कळविले जाणार नाही.

७) उमेदवाराचा महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे अधिवास असणे आवश्यक आहे.

८) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने पुणे शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र आवश्यकतेनुसार जिल्हयातील इतर केंद्रावरही परिक्षा घेतली जाईल.

९) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१०) बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लिकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यासंदर्भात कोणतीही जाहिरात अगर माहिती ही बेकायदेशीर आहे असे समजण्यात यावे.

११) काही अपरिहार्य/आपत्कालीन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे/पुढे ढकलणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

१२) भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे वाद/तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

१३) सदर भरती प्रक्रिये अंतर्गत कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या संदर्भातील शासनाकडील वेळोवेळीच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात यावे.

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.

**उ) ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पद्धत :**

१) लेखनिक पदाकरीता बँकेच्या **https://pdccbank.co.in/careers/** व **https://punedccbank.in** या अधिकृत संकेत स्थळावरुन ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. उमेदवारानी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई–मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपुर्ण प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई–मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. **सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

२) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईल पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुकी झाल्यास किंवा त्रुटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

३) उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

४) उमेदवारांना एका पेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच एका पेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रियेत अपात्र करुन निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

५) ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सूचना बँकेच्या **https://pdccbank.co.in/careers/** व **https://punedccbank.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दि.१६.०८.२०२१ रोजी पर्यंत खुला राहील.

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.

६) ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम फक्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये चलनाद्वारे स्विकारली जाईल. अन्य कोणत्याही मार्गाने परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. त्यासाठीचे चलन ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर उमेदवारांना प्राप्त होईल. **ऑनलाईन परिक्षा शुल्क दि. १७.०८.२०२१ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत स्विकारले जाईल.** ऑनलाईन परिक्षा शुल्क भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

७) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचे अद्यावत ३.५ सें.मी × ४.५ सें.मी आकारातील **"JPG/JPEG"** या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्वतः स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली १.५ सें.मी × ३.५ सें.मी आकारातील **"JPG/JPEG"** प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करुन **https://pdccbank.co.in/careers/** व **https://punedccbank.in** या संकेत स्थळावरील सूचनेनुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज २० के.बी. ते ५० के.बी च्या मध्ये असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज १० के.बी. ते २० के.बी.च्या मध्ये असावी.

८) उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना स्वतःचे आधार कार्ड **"JPG/JPEG"** या प्रकारामध्ये स्कॅन करुन **https://pdccbank.co.in/careers/** व **https://punedccbank.in** संकेत स्थळावरील सूचनेनुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधार कार्ड स्कॅन केलेल्या इमेजची साईज २० के.बी. ते ५० के.बी च्या मध्ये असावी.

९) **उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सूचना (How to Apply) वाचून घ्याव्यात त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लीक (Click) करावे** आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्याबाबत खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

I) ऑनलाईन परिक्षा शुल्क पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये चलनाद्वारे भरणा करता येईल.

II) उपरोक्त नमूद संकेतस्थळावरुन ऑनलाईन परिक्षा अर्ज भरल्यानंतर बँकेच्या शाखेत परिक्षा शुल्क (पैसे) भरण्याचे चलन उमेदवारांना प्राप्त होईल.

III) सदर परिक्षा शुल्क (पैसे) भरण्याचे चलन प्राप्त झाल्यानंतर पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये परिक्षा शुल्क (पैसे) भरण्यासाठी चलन जमा करावे.

IV) बँकेच्या संबंधित शाखेकडून सदर चलनचा ट्रान्झेक्शन नंबर व स्क्रोल नंबर प्राप्त होईल.

V) **सदर ट्रान्झेक्शन नंबर व स्क्रोल नंबर बँकेच्या संकेत स्थळावर जाऊन उमेदवाराने ऑनलाईन फॉर्मवर अपडेट करावा. तसेच चलनाची छायांकित प्रत "JPG/JPEG"** या प्रकारामध्ये स्कॅन करून संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहित पध्दतीने अपलोड करावे. चलन स्कॅन केलेल्या इमेजची साईज २० के.बी. ते ५० के.बी च्या मध्ये असावी.

VI) **ट्रान्झेक्शन नंबर व स्क्रोल नंबर अपडेट केल्यानंतर अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.** ऑनलाईन परिक्षा शुल्क चलन संकेतस्थळावर **(Update)** करावयाची अंतिम दि. १८.०८.२०२१ असेल.

VII) उमेदवारांनी त्यांचा अर्ज बँकेच्या संकेतस्थळावरुन स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1

१०) **ऑनलाईन अर्ज वेबसाईट वर भरण्याची अंतिम तारीख दि. १६.०८.२०२१ रोजी पर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल. ऑनलाईन परिक्षा शुल्क भरणा माहिती संकेत स्थळावर अद्ययावत (Update) करण्याची अंतिम दि.१८.०८.२०२१ रोजी पर्यंत राहील.**

११) ऑनलॉईन परीक्षेची माहिती उमेदवारास ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील, सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवळी प्रसिद्ध करण्यात येणारी भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील उमेदवारास परिक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरताना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

**उपरोक्त पात्रता, निकष व निवड प्रक्रियेच्या निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार कार्यवाही करण्यात येईल व तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.**

**दिनांक : ०७.०८.२०२१**
**ठिकाण : पुणे**

PUNE DIST. CENTRAL CO-OP BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.

**स्वाक्षरी-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**